महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/राष्ट्रीय मतदार दिन/२०२२/ 78 दिनांक : ०५.०१.२०२२.

0 5 JAN 2022

**महत्वाचे परिपत्रक**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित संस्था
पुणे विभाग.

विषय : दिनांक २५ जानेवारी रोजी राष्ट्रिय मतदार दिन आयोजित करणेबाबत..
संदर्भ : १) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, म.रा. यांचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१५३/विशि-३, दिनांक २३.०७.२०२१.
२) या विभागीय कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. तंशिविकापु/विवि/२०२०-२१/३२७३ दि. ०२.०८.२०२१.
३) मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र संकीर्ण २०२१/प्र.क्र.८००/२१/३३ दिनांक २१.१२.२०२१.
३) मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचे आदेश क्र. पीईई-३/कावि/१३७४/२०२१ दिनांक .१२.२०२१

उपरोक्त विषयास अनुसरुन, संदर्भ क्रमांक १ मधील शासन परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे मतदारांचे पध्दतशीर शिक्षण आणि निवडणूक सहभाग या कार्यक्रमांतर्गत संस्थेतील विद्यार्थ्यांना निवडणूक प्रक्रियेबद्दल माहिती व्हावी, त्यांच्यामध्ये मतदार म्हणून नावनोंदणी व मतदान करण्याविषयी व लोकशाहीविषयी जागृकता आणावी, या उद्देशाने आपल्या संस्थेत निवडणूक साक्षरता मंडळाची स्थापना करण्याविषयी तसेच निवडणूक साक्षरता मंडळाचा नोडल अधिकारी असणा-या शिक्षकांचे आणि विद्यार्थी प्रमुखांचे संपर्क क्रमांक (भ्रमणध्वनी व ई-मेल आयडी) मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयास ई-मेलद्वारे कळविणेबाबत व शासन परिपत्रकामध्ये नमूद केल्याप्रमाणे व दिलेल्या निर्देशाप्रमाणे आवश्यक कार्यवाही करणेबाबत या विभागीय कार्यालयाच्या संदर्भीय परिपत्रक क्रमांक २ अन्वये सर्व संस्थांना कळविण्यात आलेले आहे. **याअनुषंगाने आपल्या संस्थेत स्थापन केलेल्या निवडणूक साक्षरता मंडळाचे नोडल अधिकारी असणा-या शिक्षकांचे आणि विद्यार्थी प्रमुखांचे यादी सोबत जोडलेल्या गुगल फॉर्मच्या** https://forms.gle/VdVH4c1GCXz4T23E8 **या लिंक वर क्लिक करुन संबंधित माहिती भरून या विभागीय कार्यालयास सादर करावी व संदर्भ क्रमांक २ मध्ये जोडलेल्या परिशिष्ठ १ मध्ये देण्यात आलेल्या आपल्या जिल्हा कार्यालयाच्या ई-मेल आयडीवर पाठविण्यात यावीत.**

तसेच मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी संदर्भ क्रमांक ३ मध्ये दिलेल्या सूचनांप्रमाणे आपल्या संस्थेमध्ये खालीलप्रमाणे कार्यक्रम राबवून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या विभागीय कार्यालयास तसेच संदर्भ क्रमांक २ मधील परिशिष्ठ १ मध्ये देण्यात आलेल्या आपल्या जिल्हा कार्यालयाच्या ई-मेल आयडीवर सादर करावा.

१. आपल्या संस्थेतील निवडणूक साक्षरता मंडळाने यंदाचा राष्ट्रीय मतदार दिन जिल्हा आणि मतदार नोंदणी कार्यालयासोबत त्यांच्या मार्गदर्शनाखाली संयुक्तपणे साजरा करावा.
२. संस्थेमध्ये राष्ट्रीय मतदार दिन साजरा करताना कोविड-१९ च्या नियमांचे पालन करुन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदवावा. यादृष्टीने २५ जानेवारी आधी विविध स्पर्धा आयोजित कराव्यात. उदा. निबंध, वक्तृत्व, रांगोळी, चित्रकला, भित्तिपत्रक (पोस्टर), रील (एक मिनिटांचे व्हिडीओ), मीम, गाणे, विडंबन काव्य, घोषवाक्य इ. स्पर्धांचे आयोजन करावे.(परिशिष्ट ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे)
३. राष्ट्रीय मतदार दिनारोजी वातावरण निर्मितीसाठी रांगोळी, भित्तिपत्रक यासारख्या स्पर्धा घ्याव्यात.
४. सदर स्पर्धातील विजेत्यांना २५ जानेवारी, २०२२ रोजी राष्ट्रीय मतदार दिनाच्या दिवशी बक्षिसे देण्यात यावीत.

५. सदर दिवशी मताधिकार, लोकशाही यासंबंधी व्याख्याने/परिसंवाद यांचे आयोजन करता येईल.

६. आपल्या संस्थेचे प्राचार्य/संचालक, निवडणूक मंडळाचे नोडल अधिकारी, निवडणूक साक्षरता मंडळाचे विद्यार्थी-सदस्य, विद्यार्थी-प्रमुख यांचे विद्यार्थी जीवनातील महत्व याविषयी मनोगत रेकॉर्ड करावे; आणि ते सदर कार्यक्रमाच्या आधीच संस्थेच्या संकेतस्थळावर/समाजमाध्यमांवर प्रसारीत करावे.

७. राष्ट्रीय मतदार दिनाच्या दिवशी, विद्यार्थ्यांसोबत लोकशाहीवर निष्ठा ठेवण्यासंबंधी शपथ घेण्याचा कार्यक्रम घेण्यात यावा. (मराठी हिंदी आणि इंग्रजी भाषांतील शपथेचा नमुना परिशिष्ट ७ मध्ये देण्यात आलेला आहे.)

७.१ ज्या संस्था जिल्हा आणि मतदार नोंदणी कार्यालयांसोबत राष्ट्रीय मतदार दिनाचा कार्यक्रम राबविणार आहेत, त्यांनी संस्थेच्या परिसरात मतदार जागृतीचे दालन (स्टॉल) लावावे, जेणेकरुन विद्यार्थी आणि शिक्षक यांना भारत निवडणूक आयोग आणि त्यांच्या कार्याविषयी अधिकाधिक माहिती होईल.(परिशिष्ट ८ मधील मार्गदर्शक सूचना)

७.२ स्टॉलमध्ये आयोगाची विविध प्रकाशने आणि खेळ असावेत. मतदार जागृती दालनामध्ये ही प्रकाशने आणि खेळ विद्यार्थ्यांना नेमकेपणाने समजावून सांगू शकतील, अशा अधिका-यांची नेमणूक करण्यात यावी.

७.३ विद्यार्थ्यांकडून या खेळांविषयीचे लेखी अभिप्राय नोंदवून घ्यावेत. खेळातील विजेत्यांना प्रमाणपत्र देण्यात यावे.

७.४ दालनासाठी आवश्यक प्रकाशने आणि खेळ यांची प्रत प्रत्येक जिल्हा कार्यालय आणि मतदार नोंदणी कार्यालयांमध्ये उपलब्ध आहे.

७.५ दालनाला लागून विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यासाठी सेल्फी पॉइंट तयार करण्यात यावा.

७.६ शक्य असल्यास दालनात स्क्रीन आणि लॅपटॉपची सोय करावी, जेणेकरुन त्यावर मतदार जागृतीचे व्हिडीओ सातत्याने दाखवता येतील.

७.७ नवमतदारांना त्यांचे नाव मतदार यादीत कसे शोधायचे याविषयी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करावे.

७.८ दालनात लावायच्या स्टॅंडी, बॅनर, घोषवाक्ये यांच्या कॉपी असलेला दुवा पुढीलप्रमाणे (https://drive.google.com/drive/folders/1H_asl10PWfBVsj-YUxop6Lb9vSEu9qHz?usp=sharing) हे साहित्य छापील स्वरुपात दालनात लावावे. हे साहित्य समजावून सांगणारे टिपणही सदर दुव्यामध्ये अंतर्भूत आहे. त्यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना परिशिष्ट ८ मध्ये आहे.

८. राष्ट्रीय मतदार दिनाच्या कार्यक्रमाचा फोटोसहित अहवाल ३१ जानेवारी, २०२२ पर्यंत या विभागीय कार्यालयास info.dteropune@gmail.com या ई-मेल आयडी वर न चुकता सादर करावा.

९. राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यासंबंधी भारत निवडणूक आयोगाकडून थिम पाठविली जाईल, तीही आपल्या संस्थेस कळवली जाईल. तोवर आपल्या पातळीवर राष्ट्रीय मतदार दिनाच्या तयारीसाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून वरील कार्यक्रम पाठविण्यात आला आहे.

(डॉ. दत्तात्रय जाधव )
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे.

# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्रमांक :- संकीर्ण-२०२१/प्र. क्र. ८००/२१/३३
सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २१ डिसेंबर,२०२१

प्रति,

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, सर्व

**विषय:- दि.२५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिन आयोजित करण्याबाबत.**

महोदय/महोदया,

दि. २५ जानेवारी १९५० रोजी भारत निवडणूक आयोगाची स्थापना झाली. आयोगाचा हा स्थापना दिवस २०११ पासून संपूर्ण देशभरात 'राष्ट्रीय मतदार दिन' म्हणून साजरा केला जातो. राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्याचा मुख्य उद्देश हा मतमदारांना, विशेषतः नवमतदारांना मतदार यादीत नाव नोंदणीसाठी प्रोत्साहन देणे, सुलभरीत्या त्यांची नाव नोंदणी करून घेणे, हा आहे. देशातील मतदारांना सर्मपित केलेल्या या दिवसाचा उपयोग मतदारांचा निवडणूक प्रक्रियेतील सहभाग वाढावा म्हणून त्यांना जागरूक करण्यासाठी केला जातो. राष्ट्रीय मतदार दिनाच्या कार्यक्रमात नवमतदारांचा सत्कार करून त्यांना मतदार ओळखपत्र दिले जाते.

या पार्श्वभूमीवर सर्व जिल्हा कार्यालयांनी आणि मतदार नोंदणी कार्यालयांनी २५ जानेवारी रोजी कार्यक्रम आयोजित करावेत. निवडणूक साक्षरता मंडळे सक्षम करण्याच्या दृष्टीने यंदाच्या राष्ट्रीय मतदार दिनाचा कार्यक्रम आखलेला आहे. त्यासाठी पुढीलप्रमाणे नियोजन करावे :-

**भाग I**

१. महाराष्ट्रातील सहा महसूल विभागांतून प्रत्येकी एक उत्कृष्ट जिल्हा निवडणूक अधिकारी, उत्कृष्ट उपजिल्हा निवडणूक अधिकारी, उत्कृष्ट मतदार नोंदणी अधिकारी किंवा साहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, उत्कृष्ट मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांची निवड केली जाईल. सदर उत्कृष्ट अधिकाऱ्यांचा मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या राष्ट्रीय मतदार दिनाच्या कार्यक्रमात गौरव केला जाईल. या निवडीची प्रक्रिया साधारण पुढीलप्रमाणे असेल, त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी :

अ. प्रत्येक जिल्हा कार्यालयाने आपल्या जिल्ह्यातील एक उत्कृष्ट मतदार नोंदणी अधिकारी किंवा साहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, एक उत्कृष्ट मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचे नाव विभागीय आयुक्तांना कळवावे. या निवडीचे निकष सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र. १ व २ मध्ये आहे.

आ. महाराष्ट्रातील सहा महसूल विभागांतून प्रत्येकी एक उत्कृष्ट जिल्हा निवडणूक अधिकारी, उत्कृष्ट उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांची निवड विभागीय आयुक्त करतील. या निवडीचे निकष सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र. ३ व ४ मध्ये आहे.

२. महाराष्ट्रातील सहा महसूल विभागांतून प्रत्येकी एक याप्रमाणे, समाजमाध्यमांवर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कार्यालयांना पुरस्कार दिला जाईल. या निवडीचे निकष सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र. ५ मध्ये आहे. मतदार नोंदणी आणि जागृती यांसंबंधीच्या कार्यात उत्कृष्ट कार्य केलेल्या सामाजिक संस्थेचा प्रत्येक जिल्ह्याने राष्ट्रीय मतदार दिनाला गौरव करावा.

३. राष्ट्रीय मतदार दिनाला नवमतदारांना ओळखपत्र वाटप करण्यासाठी स्त्री, पुरुष, अपंग (स्त्री-पुरुष), तृतीय पंथीय यांचा समावेश असेल, असे पाहावे. सदर मतदारांचे मतदार दिनाच्या आधीच मतदार नाव नोंदणी संबंधीचे अनुभव (बाइट) रेकॉर्ड करण्यात यावेत आणि ते कार्यालयाच्या प्रसारमाध्यमांवर प्रसारित करण्यात यावेत.

**भाग II**

१. यंदाचा राष्ट्रीय मतदार दिन साजरा करताना आपल्या जिल्ह्यात/मतदारसंघात असलेल्या शाळा-कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये (इ. नववी ते बारावी) आणि वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये परिपत्रकानुसार निवडणूक साक्षरता मंडळे स्थापन झाली आहेत का, असल्यास त्यांची सद्यःस्थिती नोंदवावी. ज्या शाळा-महाविद्यालयांमध्ये निवडणूक साक्षरता मंडळे स्थापन झाली नसतील, तिथे ती स्थापन करण्यात पुढाकार घ्यावा, मार्गदर्शन करावे.

२. जिल्हा आणि मतदार नोंदणी कार्यालयांनी यंदाचा राष्ट्रीय मतदार दिन आपल्या परिसरातील **शाळेतील किंवा महाविद्यालयातील निवडणूक साक्षरता मंडळासोबत संयुक्तपणे साजरा करावा.** तसेच, आपल्या अखत्यारीत उर्वरित शाळा-महाविद्यालयांना सदर दिन निवडणूक साक्षरता मंडळांतर्गत साजरा करण्याबाबत प्रोत्साहन द्यावे आणि मार्गदर्शन करावे.

३.१ शाळा-महाविद्यालयांसोबत सदर दिन साजरा करताना मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित राहावेत, या दृष्टीने 25 जानेवारीआधी विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा आयोजित कराव्यात. उदा. निबंध, वक्तृत्व, रांगोळी, चित्रकला, भित्तिपत्रक (पोस्टर), रील (एक मिनिटांचे व्हिडिओ), मीम, गाणे, विडंबन काव्य, घोषवाक्य इ. स्पर्धा. या स्पर्धा आयोजित करताना त्या आंतरशालेय/आंतरमहाविद्यालयीन ठेवल्यास त्यामध्ये इतर शाळा-महाविद्यालयांमधील विद्यार्थीही सहभागी होऊ शकतील. या स्पर्धांचे आयोजनही सदर महाविद्यालयाच्या निवडणूक साक्षरता मंडळांतर्गत करावे. (शाळा-कनिष्ठ महाविद्यालय आणि वरिष्ठ महाविद्यालय यांच्यासाठी विविध स्पर्धांच्या विषयांची यादी परिशिष्ट ६ मध्ये देण्यात आली आहे.)

३.२ कार्यक्रमाच्या दिवशीही वातावरणनिर्मितीसाठी रांगोळी, भित्तिपत्रक यांसारख्या स्पर्धा घेता येतील.

३.३ सदर स्पर्धांतील विजेत्यांना २५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिनाला बक्षिसे देण्यात यावीत.

४. सदर दिवशी मताधिकार, लोकशाही यांसंबंधी व्याख्याने/परिसंवाद यांचे आयोजन करता येईल.

५. ज्या महाविद्यालयात मतदार दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, त्या महाविद्यालयाचे प्राचार्य, निवडणूक साक्षरता मंडळाचे नोडल अधिकारी, निवडणूक साक्षरता मंडळाचे विद्यार्थी-सदस्य,

विद्यार्थी-प्रमुख यांचे निवडणूक साक्षरता मंडळाची स्थापना, अशा मंडळाचे विद्यार्थी जीवनाताली महत्त्व याविषयीचे मनोगत रेकॉर्ड करावे; आणि ते सदर कार्यक्रमाच्या आधीच कार्यालयाच्या समाजमाध्यमांवर प्रसारित करावे.

६. **सदर दिवशी विद्यार्थ्यांसोबत लोकशाहीवर निष्ठा ठेवण्यासंबंधी शपथ घेण्याचा कार्यक्रम घेण्यात यावा.** (मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषांतील शपथेचा नमुना परिशिष्ट ७ मध्ये देण्यात आलेला आहे.)

७.१ ज्या शाळा-महाविद्यालयासोबत जिल्हा आणि मतदार नोंदणी कार्यालये राष्ट्रीय मतदार दिनाचा कार्यक्रम राबवणार आहेत, त्या शाळा-महाविद्यालयाच्या परिसरात **मतदार जागृतीचे दालन (स्टॉल) लावावे,** जेणेकरून विद्यार्थी आणि शिक्षक यांना भारत निवडणूक आयोग आणि त्याच्या कार्याविषयी अधिकाधिक माहिती होईल.

७.२ स्टॉलमध्ये आयोगाची विविध प्रकाशने आणि खेळ असावेत. मतदार जागृती दालनामध्ये ही प्रकाशने आणि खेळ विद्यार्थ्यांना नेमकेपणाने समजावून सांगू शकतील, अशा अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात यावी.

७.३ विद्यार्थ्यांकडून या खेळांविषयीचे लेखी अभिप्राय नोंदवून घ्यावेत. खेळांतील विजेत्यांना प्रमाणपत्र देण्यात यावे.

७.४ प्रत्येक जिल्हा कार्यालय आणि मतदार नोंदणी कार्यालय यांना दालनासाठी आवश्यक प्रकाशने आणि खेळ यांच्या प्रत्येकी एक प्रत मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून पाठवली जाईल.

७.५ दालनाला लागून विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यासाठी सेल्फी पॉइंट तयार करण्यात यावा.

७.६ शक्य असल्यास दालनात स्क्रीन आणि लॅपटॉपची सोय करावी, जेणेकरून त्यावर मतदार जागृतीचे व्हिडिओ सातत्याने दाखवता येतील.

७.७ नवमतदारांना त्यांचे नाव मतदार यादीत कसे शोधायचे याविषयी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करावे.

७.८ दालनात लावायच्या स्टँडी, बॅनर, घोषवाक्ये यांच्या सॉफ्ट कॉपी असलेला दुवा पुढीलप्रमाणे:
https://drive.google.com/drive/folders/१H_asl१OPWfBVsj-YUxop६Lb१vSEu१qHz?usp=sharing

हे साहित्य छापील स्वरूपात दालनात लावावे. हे साहित्य समजावून सांगणारे टिपणही सदर दुव्यामध्ये अंतर्भूत आहे. त्यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना परिशिष्ट ८ मध्ये आहे.

८. राष्ट्रीय मतदार दिनाच्या कार्यक्रमाचा फोटासहित अहवाल १ फेब्रुवारी २०२२ पर्यंत मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाला पाठविण्यात यावा.

९.१ **यंदाचा राष्ट्रीय मतदार दिन शाळा-महाविद्यालयांमध्ये साजरा करण्याचे मुख्य प्रयोजन निवडणूक साक्षरता मंडळांचे सक्षमीकरणे करणे,** हे असल्याने कार्यक्रमाच्या अहवालासोबतच आपल्या जिल्ह्यातील शाळा-महाविद्यालयांमधील निवडणूक साक्षरता मंडळांच्या संपर्कांची यादी आधी दिलेल्या स्वरूपात (फॉरमॅटमध्ये) मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाला १ फेब्रुवारी २०२२ पर्यंत पाठविण्यात यावी.

९.२ या यादीतील संपर्कानुसार आपण त्यांचे व्हॉटसअॅप आणि टेलिग्राम गट तयार करणार असल्याने यांतील मोबाइल क्रमांक, मेल आयडी आणि इतर तपशील अचूक आणि खरे असतील, असे पाहावे.

१०. राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यासंबंधी भारत निवडणूक आयोगाकडून थिम पाठवली जाईल, तीही आपल्या कार्यालयास कळवली जाईल. तोवर आपल्या पातळीवर राष्ट्रीय मतदार दिनाच्या तयारीसाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून वरील कार्यक्रम पाठविण्यात आला आहे.

आपला,

(श्रीकांत देशपांडे)
प्रधान सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य

सोबत :- परिशिष्ट क्र. १ ते ८

प्रत :-

उप जिल्हाधिकारी तथा उप जिल्हा निवडणूक अधिकारी, सर्व

## परिशिष्ट ६

**शाळा (इ. नववी व दहावी) आणि कनिष्ठ महाविद्यालये यांच्यासाठी विविध स्पर्धांच्या विषयांची सर्वसमावेशक यादी :**

1. सक्षम लोकशाहीची पहिली पायरी - मतदार नोंदणी
2. वर्गप्रमुख पदाची निवडणूक मी अशी लढवणार...
3. माझा नगरसेवक/सरपंच असा हवा...
4. मी नगरसेवक/सरपंच झालो / झाले तर...
5. मी आमदार झालो / झाले तर...
6. माझा आमदार असा हवा...
7. मी खासदार झालो / झाले तर...
8. माझा खासदार असा हवा
9. एका बोटावरच्या शाईची किंमत?
10. मी मताधिकार बजावणार कारण...
11. अठराव्या वर्षाची जबाबदारी

**वरिष्ठ महाविद्यालयांसाठी विविध स्पर्धा आणि विषयांची यादी :**

**अ. निबंध**

1. मी मताधिकार बाजावणार कारण...
2. मताधिकाराची सक्ती करावी का?
3. सोहळा लोकशाहीचा जागर मताधिकाराचा
4. हक्क वंचितांचे मार्ग मताधिकाराचा
5. मी नव्या युगाचा / युगाची मतदार
6. शहरी मतदारांची अनास्था — कारणे आणि उपाय
7. मी माझं मत विकणार नाही!
8. एका बोटावरच्या शाईची किंमत?

**आ. मीम**

1. निवडणुकीच्या दिवशी फिरायला जाणारे लोक
2. सगळी व्यवस्था भ्रष्ट आहे असे समजून मताधिकार न बजावणारे लोक
3. मतदार नोंदणी न करणारे लोक
4. अठराव्या वर्षाची जबाबदारी - मतदार नोंदणी
5. माझ्या महाविद्यालयातील 18 वर्षे पूर्ण केलेल्या युवांनी मतदार नोंदणी करावी म्हणून...

**इ. लघुपट**

1. गोष्ट लोकशाहीची

2. मताधिकार हा माझा कायदेशीर अधिकार
3. सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराचे महत्त्व
4. अपंगांच्या मताधिकाराचे महत्त्व आणि आवाहन
5. तृतीय पंथीयांच्या मताधिकाराचे महत्त्व आणि आवाहन

**ई. वक्तृत्व**

1. आपल्या देशात लोकशाही रुजली आहे का?
2. ...म्हणून मी मताधिकार बजावतो / बजावते!
3. लोकशाही आणि तरुण मतदार
4. व्यवस्था बदलाचा राजमार्ग : मताधिकार
5. मताधिकाराची सक्ती करावी का?
6. सक्षम लोकशाहीची पहिली पायरी – मतदार नोंदणी

**उ. चित्रकला**

1. 18 वर्षे पूर्ण झालेल्यांना मतदार नोंदणी करण्याचे आवाहन
2. स्त्रियांना मतदार नोंदणीचे आवाहन
3. अपंगांच्या मताधिकाराचे महत्त्व आणि आवाहन
4. तृतीय पंथीयांच्या मताधिकाराचे महत्त्व आणि आवाहन

**ऊ. घोषवाक्य**

1. सर्वोत्कृष्ट शासनपद्धती – लोकशाही
2. 18 वर्षे पूर्ण झालेल्यांना मतदार नोंदणीचे आवाहन
3. मताधिकाराचे महत्त्व

**ए. गाणे –**

१. लोकशाही शासनपद्धतीचे फायदे
२. 18 वर्षे पूर्ण झालेल्यांना मतदार नोंदणीचे आवाहन
३. सक्षम लोकशाहीसाठी मताधिकाराचे महत्त्व

परिशिष्ट ७

राष्ट्रीय मतदार दिवस
मतदारांसाठी प्रतिज्ञा

## मराठी

"आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे, प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परपरांचे जतन करु आणि मुक्त नि:पक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणूकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणूकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करु."

## हिंदी

"हम, भारत के नागरिक, लोकतंत्र मे. अपनी पूर्ण आस्था रखते हुए यह शपथ लेते हैं की हम अपने देश की लोकतांत्रिक परम्पराओंकी मर्यादा को बनाए रखेंगे तथा स्वतंत्र, निष्पक्ष एवं शांतिपूर्ण निर्वाचन की गरिमा को अक्षुण्ण रखते हुए, निर्भीक होकर, धर्म, वर्ग, जाति, समुदाय, भाषा अथवा अन्य किसी भी प्रलोभन से प्रभावित हुए बिना सभी निर्वाचनो में अपने मताधिकार का प्रयोग करेंगे."

## English

**"We, the citizens of India, having abiding faith in democracy, hereby pledge to uphold the democratic traditions of our country and the dignity of free, fair and peaceful elections, and to vote in every election fearlessly and without being influenced by considerations of religion, race, caste, language or any inducement."**

*****************

## परिशिष्ट - ८

## राष्ट्रीय मतदार दिनाला दालन (स्टॉल) लावण्यासंबंधी मार्गदर्शक सूचना

- जिल्हा आणि मतदार नोंदणी कार्यालयांनी यंदाचा राष्ट्रीय मतदार दिन आपल्या परिसरातील शाळेतील किंवा महाविद्यालयातील निवडणूक साक्षरता मंडळासोबत संयुक्तपणे साजरा करावा.

- ज्या शाळा-महाविद्यालयासोबत जिल्हा आणि मतदार नोंदणी कार्यालये राष्ट्रीय मतदार दिनाचा कार्यक्रम राबवणार आहेत, त्या शाळा-महाविद्यालयाच्या परिसरात मतदार जागृतीचे दालन (स्टॉल) लावावे, जेणेकरून विद्यार्थी आणि शिक्षक यांना भारत निवडणूक आयोग आणि त्याच्या कार्याविषयी अधिकाधिक माहिती होईल.

- दालनामध्ये आयोगाची विविध प्रकाशने आणि खेळ असावेत. मतदार जागृती दालनामध्ये ही प्रकाशने आणि खेळ विद्यार्थ्यांना नेमकेपणाने समजावून सांगू शकतील, अशा अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात यावी.

- विद्यार्थ्यांकडून मतदार जागृतीविषयीचे खेळ खेळून घेतले जावेत. विद्यार्थ्यांकडून खेळांविषयीचे लेखी अभिप्राय नोंदवहीत नोंदवून घ्यावेत. सदर अभिप्राय मुनिअ कार्यालयास मेलवर स्कॅन करून पाठवण्यात यावेत.

- मतदार जागृती खेळांतील विजेत्यांना प्रमाणपत्र देण्यात यावे. प्रमाणपत्राची खुली (ओपन) फाइल गूगल ड्राईव्ह लिंकमध्ये देण्यात आलेली आहे. त्यावर जिल्हा/मतदार नोंदणी कार्यालयाचे नाव, जिल्हाधिकाऱ्यांचे नाव एडिट करून, त्यांची सही घेऊन, खेळांतील विजेत्यांना द्यावेत.

- प्रत्येक जिल्हा कार्यालय आणि मतदार नोंदणी कार्यालय यांना दालनासाठी आवश्यक प्रकाशने आणि खेळ यांच्या प्रत्येकी एक प्रत मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून पाठवली जाईल.

- दालनाला लागून विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यासाठी सेल्फी पॉइंट तयार करण्यात यावा.

- शक्य असल्यास दालनात स्क्रीन आणि लॅपटॉपची सोय करावी, जेणेकरून त्यावर मतदार जागृतीचे व्हिडिओ सातत्याने दाखवता येतील. स्क्रिनवर दाखवले जाणारे मतदार जागृतीचे व्हडिओ, फोटो, गूगल ड्राइव्ह लिंकवरील 'स्क्रिनवर दाखवले जाणारे साहित्य' या फोल्डरमध्ये दिलेले आहे.

- नवमतदारांना त्यांचे नाव मतदार यादीत कसे शोधायचे याविषयी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करावे.

- दालनात लावायच्या स्टँडी, बॅनर, घोषवाक्ये यांच्या सॉफ्ट कॉपी असलेला दुवा पुढीलप्रमाणे: https://drive.google.com/drive/folders/१H_asl१OPWfBVsj-YUxop६Lb९vSEu१qHz?usp=sharing

सदर साहित्य वरील दुव्यामध्ये खालील फोल्डर-अंतर्गत दिलेले आहे :

1. स्टँडी - 6 x 3 या आकाराचे 6 स्टँडी दिलेले आहेत.

अ. निवडणूक साक्षरता मंडळ

आ. मतदार जागृती मंच

इ. चुनाव पाठशाला
ई. मतदार नोंदणी
उ. 'कोण सावध मतदार आहे?' हा खेळ (सापशिडी)
ऊ. 'सुलभ व सुगम मतदान' हा खेळ (लुडो)

हे सहा स्टँडी दालनाच्या भिंतींवर चिटकवायचे आहेत. याव्यतिरिक्त हे स्टँडी कार्यक्रमाच्या आवारातही उभे करता येतील. यामध्ये मतदार दिनासंबंधी आणखी काही स्टँडी नव्याने समाविष्ट केले जातील, त्यादेखील प्रिंट करून लावायच्या आहेत.

2. जमिनीवर पसरवून खेळले जाणारे खेळ – या फोल्डरमध्ये एकूण 5 खेळ खुल्या फाईल्स व पीडीएफ स्वरूपात दिलेले आहेत. सदर खेळ जमिनीवर पसरवून खेळले जाणारे आहेत, त्यामुळे ते फ्लेक्सच्या स्वरूपात दिलेल्या साईजमध्ये प्रिंट करून घेणे. सोबत खेळण्यासाठी सहा अंक असलेला डाइस (Dice) ही घ्यावा. प्रत्येक खेळासोबत तो कसा खेळायचा, याची माहिती दिलेली आहे.

अ. कोण माहितगार मतदार आहे ? (साईज - ६० X ८४ in)
आ. सुलभ व सुगम मतदान (साईज - ६० X ८४ in)
इ. मतदान करण्याचे टप्पे (साईज - ९६ X ७२ in)
ई. अर्जाचे नमुने शोधा (साईज - ६० X ८४ in)
उ. कोण सावध मतदार आहे (साईज - ८४ X ६० in)

3. QR Code -

मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत निवडणूक साक्षरता मंडळसंबंधीच्या पुस्तकांचा एक संच (सेट) प्रत्येक जिल्हा व मतदार नोंदणी कार्यालयाला दिला जाणार आहे. ती पुस्तके दालनात माहितीसाठी ठेवायची आहेत. याव्यतिरिक्त निवडणुकीसंबंधीची इतर पुस्तकेही दालनात ठेवता येतील.

सदर QR Code स्कॅन केल्यावर नागरिकांना ही सर्व पुस्तके मोफत ऑनलाइन उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे याची एक पाटी / प्रिंटआउट स्टॉलवर लावून सदर पुस्तके ऑनलाइन वाचण्यासाठी नागरिकांना आवाहन करावे.

4. सेल्फी पॉईंट –

स्टॉलजवळ सेल्फी पॉईंट तयार करून घ्यावा. यासाठीचा मजकूर गूगल ड्राइव्हमध्ये दिलेला आहे.

स्टॉलमध्ये एक संगणक / लॅपटॉपची व्यवस्था करावी. तेथे सर्वांची नाव नोंदणी, यादीतील नाव तपासणी करण्यात यावी. यामध्ये मतदार यादीत नाव असलेल्या व  नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना, शिक्षकांना सेल्फी काढण्यास प्रोत्साहित करणे.

5. डाव्या हातावर निळी शाई लावलेले बोट -  कटआउट तयार करून स्टॉलजवळ उभे करावे. याचा संदर्भ म्हणून फोटो व प्रिंटींगसाठी ओपन फाईल या फोल्डरमध्ये दिलेली आहे.

6. लोकशाही आकाशकंदील – सजावटीसाठी लोकशाही, मतदार जागृती यांसंबंधीची घोषवाक्ये लिहिलेले आकाशकंदील दालन सजावटीसाठी वापरता येतील. याचे संदर्भ म्हणून फोटो व घोषवाक्यांची यादी या फोल्डरमध्ये दिलेली आहे.

7. स्क्रिनवर दाखवले जाणारे साहित्य - स्क्रिनवर दाखवले जाणारे मतदार जागृतीचे व्हिडिओ फोटो गुगल ड्राइव्ह लिंक स्क्रिनवर दाखवले जाणारे साहित्य या फोल्डरमध्ये दिलेले आहे.

8. खेळातील विजेत्यांसाठी प्रमाणपत्र - याची ओपन फाइल फोल्डमध्ये आहे. ती आपणांस एडिट करून वापरता येईल.

## परिशिष्ट -१

## राज्यातील सर्व उप जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे ईमेल आयडी

| अ. क्र. | जिल्हा | जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी ईमेल आयडी |
|---|---|---|
| १ | मुंबई | electionmumbaicity@gmail.com |
| २ | मुंबई उपनगर | dyelectionmsd@gmail.com |
| ३ | ठाणे | dydeothane@gmail.com |
| ४ | पालघर | dydeopalghar@gmail.com |
| ५ | रायगड | dydeoraigad@gmail.com |
| ६ | रत्नागिरी | dydeoratnagiri@gmail.com |
| ७ | सिंधुदुर्ग | dydeosindhudurg@gmail.com |
| ८ | पुणे | dydeopune१@gmail.com |
| ९ | सातारा | dydeosatara@gmail.com |
| १० | सांगली | dydeosangli@gmail.com |
| ११ | सोलापूर | dydeosolapur@gmail.com |
| १२ | कोल्हापूर | dydeokolhapur@gmail.com |
| १३ | अहमदनगर | dydeoahmednagar@gmail.com |
| १४ | धुळे | dydeodhule@gmail.com |
| १५ | जळगाव | dydeojalgaon@gmail.com |
| १६ | नंदुरबार | dydeonandurbar@gmail.com |
| १७ | नाशिक | dydeonashik@gmail.com |
| १८ | औरंगाबाद | dydeoaurangabad@gmail.com |
| १९ | बीड | dydeobeed@gmail.com |
| २० | हिंगोली | dydeohingoli@gmail.com |
| २१ | जालना | dydeojalna@gmail.com |
| २२ | लातूर | dydeolatur@gmail.com |
| २३ | नांदेड | dydeonanded@gmail.com |
| २४ | उस्मानाबाद | dydeoosmanabad@gmail.com |
| २५ | परभणी | dydeoparbhani@gmail.com |
| २६ | अमरावती | dydeoamravati@gmail.com |
| २७ | अकोला | dydeoakola@gmail.com |
| २८ | बुलढाणा | dydeobuldhana@gmail.com |

| | | |
|---|---|---|
| २९ | वाशिम | dydeowashim@gmail.com |
| ३० | यवतमाळ | dydeoyavatmal@gmail.com |
| ३१ | नागपूर | dydeonagpur@gmail.com |
| ३२ | वर्धा | dydeowardha१@gmail.com |
| ३३ | भंडारा | dydeobhandara@gmail.com |
| ३४ | चंद्रपूर | dydeo.chandrapur@maharashtra.gov.in |
| ३५ | गडचिरोली | dydeogad@gmail.com |
| ३६ | गोंदिया | dydeogondiya@gmail.com |